। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १०५ वा । मंगळवार दिनांक ३० जून, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### बसमध्ये चढताना सोन्याचे दागिणे चोरले

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी कल्पना राम काकडे, वय ४४ वर्षे, रा. विठ्ठल मंदीरजवळ जामखेड ता. जामखेड जि. अहिल्यानगर या दि. २७.०६.२०२६ रोजी भुम बसस्थानक येथे बर्शी जाणारे बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने कल्पना काकडे यांचे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण एकुण २०,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- कल्पना काकडे यांनी दि.२७.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### बहात्तर हजाराच्या केबल वायरची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२६.०६.२०२६ रोजी . काटगाव तलाव येथील वेगवेगळ्या कंपनीचे ३६०० फुट ४ एमएम कॉपर केबल वायर एकुण ७२,००० किंमतीचा माल संशयीत मारुती उर्फ बाबा महादेव वाघमारे, लक्ष्मण हणमंत माळी, मारुती साधु वाघमारे, कैमुद्दीन अहमद रंगारी सर्व रा. काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- तुकाराम केशव माळी, वय ५८ वर्षे, रा. काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२७.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच सदरा गुन्हा तपासा दरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीवरुन नळदुर्ग पोलीसांनी मारुती महादेव वाघमारे यास ताब्यात घेवून विचार पुस केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली.

### सोन्या-चांदीच्या दागिण्याची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शंकर लिंबाजी निचळ, वय २३ वर्षे, रा. बिजनवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घराचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि. २५.०६.२०२६ रोजी उचकटून तोडून टाकुन आतमध्ये प्रवेश करुन कपाटातील ५ ग्रॅम सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा एकुण ४२,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- शंकर निचळ यांनी दि.२६.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### बसस्थानक कळंब येथून सोन्याच्या दागिण्याची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी - रेखा प्रकाश कवडे, वय ६३ वर्षे, रा. कन्हेरवाडी ता. कळंब जि. धाराशिव ह.मु. ज्ञानेश्वर मंदीर जवळ धाराशिव या दि.२३.०५.२०२६ रोजी बसस्थानक कळंब येथे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून रेखा कवडे यांचे गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. कळंब पो ठाणे येथे ` गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राजकुमार वय ५७ वर्षे, रा. दर्गा गल्ली विजय चौक धाराशिव ह.मु. आरोग्य नगर उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.२८.०६.२०२६ रोजी साठे चौकातील भाजी मार्केट येथील मोकळ्या जोत उमरगा येथे अंदाजे २,५०० किंमतीची २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर नामे-शंकर वय ७० वर्षे, रा. चिंचकोट ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.२८.०६.२०२६ रोजी १८.३० वा. सु. तुरोरी ते चिंचकोट जाणारे रोडला महादेव सगर यांच्या शेताच्या बाजूच्या पत्र्याचे शेडच्या समोर अंदाजे १,७०० किंमतीची १७ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली.
यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

## प्राण्यांची निर्दयपणे वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत हुसेन रा. तुळजापूर नाका धाराशिव, मुस्तकीम रा. रसुलपुरा धाराशिव ता. जि. धाराशिव, मुजमील रा. फक्रुद्दीन नगर सोलापुर यांनी दि.२६.०६.२०२६ रोजी कलशेट्टी पेट्रोलपंपाचे समोर सोलापूर हैद्राबाद एनएच ६५ रोडवर आयशर टॅम्पो क्र एमएच १७ बीवाय ७८२७मध्ये ९ गायी, ३ पार्डी व दोन मयत गायी असा एकुण ८४,००० किंमतीचे वाहनासह ५,००,००० किंमतीचे गोवंशी जनावरे त्यांचे चारपाण्याची व्यवस्था न करता वाहना मध्ये दाटी वाटीने भरुन वाहतुक करत असताना मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (डी), ११(१) (एच) सह कलम ५ (अ), ५(ब),९ महा प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम सह कलम ३(५) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## रात्रगस्ती दरम्यान संशयित इसम ताब्यात

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत येरमाळा पो.ठा. चे पथक दि. २७.०६.२०२६ रोजी येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पथकास पांडुरंग गोविंद जाधवर यांचे पडीक विहीरीजवळ रत्नापुर शिवार येथे अंधाराचा दबा धरुन बसलेले दोन इसम दिसून आल्याने पथकास त्याचा संशय आल्याने पथकाने त्यास हाटकले. यावर त्याची विचारपुस केली असता त्याने आपले नाव- ओम , रा. दिंडोरी ता. भुम जि. धाराशिव, संतोष रा. लक्ष्मी पारधी पिडी तेरखेडा असे सांगीतले. पोलीसांनी अशा रात्री अवेळी फिरण्याचे कारण विचारले असता त्यांनी पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने ते माला विरूध्द गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे फिरत असल्याचा पोलीसांचा संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेउन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र पोलिस कायदा कलम- १२२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या बाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## दोनशे किलोच्या हाराने उद्धव ठाकरे यांचे धाराशिवात स्वागत



धाराशिव, (प्रतिनिधी)- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या धाराशिव दौऱ्यानिमित्त शहराच्या प्रवेशद्वारावर रविवारी शिंगोली सर्किट हाऊससमोरील महामार्गावर शेकडो शिवसैनिकांच्या उपस्थितीत त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी उद्धव ठाकरे यांना २०० किलो वजनाचा भव्य हार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. घोषणाबाजी, जल्लोष आणि उत्साहपूर्ण वातावरणात शिवसैनिकांनी आपल्या पक्षप्रमुखांचे स्वागत केले. या स्वागतप्रसंगी आमदार कैलास पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्धव ठाकरे यांच्या आगमनाने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी ठाकरेंचा हात सोडत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर श्री. ठाकरे रविवारी सायंकाळी शहरात दाखल झाले.

## येडशी टोलनाक्यावर वाहने थांबवून १२७ बालकांना पाजली पोलिओ लस




येडशी, (प्रतिनिधी):-राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेंतर्गत येडशी टोलनाका येथे राबवण्यात आलेल्या 'ट्रांझिट बूथ' उपक्रमाला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राथमिक आरोग्य केंद्र येडशी, चांदन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, धाराशिव व टोलनाका पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनांतील ० ते ५ वर्षे वयोगटातील १२७ बालकांना जागीच पोलिओ डोस पाजण्यात आला.

**महामार्गावरच मिळाले सुरक्षा कवच**

प्रवासात असलेल्या एकाही बालकाचा डोस चुकू नये, यासाठी टोलनाक्यावर विशेष नियोजन करण्यात आले होते. कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रवासी वाहने, एसटी बस व खाजगी गाड्या थांबवून आरोग्य पथकाला सहकार्य केले. आरोग्य कर्मचाऱ्यांनी तत्परतेने गाडीतील बालकांना पोलिओ लस पाजली. लांबच्या प्रवासात मुलाला लस कुठे मिळणार याची काळजी होती, पण टोलनाक्यावरच लस मिळाल्याने मोठी सोय झाली, अशी प्रतिक्रिया सोलापूरच्या प्रवासी सौ. कविता पाटील यांनी दिली.

आरोग्य दूतांची तत्परता, पोलिसांची सतर्कता

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी टोलनाका बूथ प्रमुख डॉ. विलास तोडकर, श्री. युवराज चौगुले, श्री. रवींद्र मैदाड,श्री आरोग्य सहायक श्री. सुनील कदम व श्री. लक्ष्मण तिंडे यांनी सकाळी ८ ते सायं. ६ वाजेपर्यंत अविरत परिश्रम घेतले. पोलीस हवालदार श्री. समाधान शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाहने थांबवून पालकांना लस देण्याचे आवाहन केल्याने मोहिमेला गती मिळाली.

**चांदन संस्थेचे मोलाचे योगदान**

चांदन बहुउद्देशीय सेवाभावी सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सूर्यकांत विठ्ठल गंगावणे व त्यांच्या स्वयंसेवकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी टोलनाका व येडशी आळणी परिसरात फिरून बालकांना शोधून लस मिळवून दिली. तसेच पालकांचे समुपदेशन करून लसीचे महत्व पटवून दिले.

**तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून अभिनंदन**

आरोग्य विभागाचे चोख नियोजन, पोलिसांची तत्परता आणि चांदन संस्थेची सेवाभावी वृत्ती यांच्या त्रिवेणी संगमामुळे येडशी परिसरातील पल्स पोलिओ मोहीम १००% यशस्वी ठरली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ प्रमोद गिरी यांनी सर्व टीमचे अभिनंदन केले असून या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## मंत्रीपदासाठी नाही, केवळ जिल्ह्याच्या विकासासाठी निर्णय
## खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकरांचे पुन्हा स्पष्टीकरण



धाराशिव (प्रतिनिधी)- महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची साथ सोडून शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय हा केवळ जिल्ह्याच्या विकासासाठी घेतला असून, मंत्रीपदाची कोणतीही अपेक्षा नसल्याचे स्पष्टीकरण खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी पुन्हा एकदा दिले.

शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर रविवारी (दि. २८) त्यांचे जिल्ह्यात आगमन झाले. यावेळी माध्यमांशी बोलताना खा. राजेनिंबाळकर म्हणाले, की माझ्या जिल्ह्यातील तसेच लोकसभा मतदारसंघातील जनतेचा आणि शिवसैनिकांचा राग मी समजू शकतो. मात्र, त्यांच्या रागावर काळ हेच उत्तर असेल. मी मंत्रीपदासाठी नाही, तर जिल्ह्याच्या विकासकामांसाठी पक्षांतर केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जनतेने सत्ताधाऱ्यांच्या बाजूने कौल दिला.

त्यामुळे मलाही हा निर्णय घ्यावा लागला. उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर टीका केली तरी मी त्यांच्याविषयी कोणतेही वक्तव्य करणार नाही, असेही श्री. राजेनिंबाळकर यांनी स्पष्ट केले.

रदरम्यान, पक्षांतरानंतर सोशल मीडियावर शिवसेनेचे कार्यकर्ते खा. ओमराजेंना मोठ्या प्रमाणावर ट्रोल करत असून, त्यांच्या निर्णयावर टीका केली जात आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना, या सर्व टीकेला काळच उत्तर देईल, असा विश्वास खा. राजेनिंबाळकर यांनी व्यक्त केला.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे: अंतर्गत संदीप वय २५ वर्षे, रा.मैसलगा ता. बसवकल्याण ता. बसवकल्याण जि. बिदर राज्य कर्नाटक ह.मु. एन.टी.पी.सी. एरीया सोलापुर, अनुराग भगवान शिंदे, वय २१ वर्षे, रा. संभाजीनगर मुरुम ता. उमरगा ह.मु. एन.टी. पी.सी. एरिया सोलापुर ता. जि. सोलापुर यांनी दि.२८.०६.२०२६ रोजी १२.५० वा. सु.रिव्हर्स साईड हॉटेलच्या जवळ एनएच ६५ बायपास रोड नळदुर्ग येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा, विमल पान मसाला,व्हि १ तंबाखु, होंडा क्टीव्हा स्कुटी क्र एमएच १४ एमआर ८६९० असा एकुण एकुण १,२५,३८० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पो ठाचे पथकास मिळून आला.

यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- २२३, २७५ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## वरुणराजाची दुसऱ्या दिवशीही हजेरी:
## ४ ते ९ जुलैपर्यंत बरसणार जोरदार पाऊस

धाराशिव (प्रतिनिधी)- जिल्ह्यात रविवारी दुपारनंतर धाराशिव, उमरगा, कळंब, तुळजापूर, लोहारा, परंडा तालुक्यात जोरदार पावसाने हजेरी लावली. रविवारी सायंकाळी धाराशिव तालुक्यातील काजळा, तेर, आरणी, भोगी, लासोना तर उमरगा तालुक्यातील आचलेर, आलूर, मुरूम, केसरजवळगा, चिंचोली, हिप्परगा रवा, आष्टा जहाँगीरसह तुळजापूर शहर व तालुक्यातील चिंचोली येथे पावसाने हजेरी लावली. कळंब तालुक्यातील येरमाळा, तेरखेडा, धोत्रा तर लोहारा तालुक्यात कानेगाव येथेही पाऊस बरसला. परंडा तालुक्यातील डोंजा, सेंद्री, शिराळासह अन्य गावांत पावसाने हजेरी लावली .

रविवारी जिल्ह्यातील अनेक तालुक्यात दुपारनंतर जोरदार पाऊस बरसला. मात्र रविवारी दिवसभर धाराशिव शहरासह परिसरात मात्र पावसाने हुलकावणी दिली. दुपारनंतर आकाशात ढग दाटले होते. ढगाळ वातावरण झाले तरी शहरा परिसरात पाऊस नाही.

## स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, बालाजी नगर, शेकापूर येथील अंगणवाडी क्रमांक ६२४ येथे रविवारी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष जयपाल शेरखाने यांनी बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेची सुरुवात केली. मोहिमेस पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आशाताई सरिता नवनाथ गायकवाड, स्नेहलता शिवप्रसाद काजळे, अंगणवाडी सेविका शामल विद्यासागर विधाते, उपस्थित होत्या. तसेच आपल्या चिमुकल्यांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यासाठी आलेल्या पालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

याप्रसंगी शून्य ते पाच वयोगटातील बालकाना पोलिओचे डोस देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पालकांनी आवर्जून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## उद्धवजींच्या दौऱ्याने चर्चेला उधाण

उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील सहा खासदार पक्ष सोडून गेल्याने डोळे उघडले आहेत काय म्हणून ते जनतेत दिसून येत आहेत. यापुर्वी निवडणुकीच्या काळातच प्रचारार्थ बाहेर पडत होते. आता ते जनतेत मिसळून संवाद साधत आहेत ही चांगली बाब आहे. वास्तविक राजाने जनतेत मिसळले पाहिजे, तरच जनतेच्या समस्या कळून येतील. नसता जनतेच्या भावना व अपेक्षा काय आहेत हे कळणार कसे? त्याचे प्रमाणे अनेक विश्वासू माणसे पेरले पाहिजेत. तरच खरी माहिती कळू शकेल. नसता काय होईल काय चालले हेच सत्य कळणार नाही. राज्यात दोनच पक्षाचा बोलबाला अधिक होता. एक शिवसेना व दुसरी भाजपा. दोघात पंचवीस वर्ष युती होती, ती नंतर तुटली. हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असते तर युती तुटली नसती. त्यांच्यात दुरदृष्टी होती. त्यामुळे जनतेच्या मनातील ते देव होते. त्यांच्या एका शब्दाला किंमत होती. अनेकांनी काही सांगितले तर सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय निर्णय घेत नसत. त्यांच्यात एवढी क्षमता होती की, ते सहज पंतप्रधान किंवा राष्ट्रपती झाले असते. ते स्वत:ला राजा नव्हे तर जनता राजा समजत होती. राजा स्वत: उच्चपद घेत नसतात तर दुसऱ्या विश्वासूंना करीत असतात. येथेच उद्धव ठाकरे यांचे चुकले. पक्षाचा आत्मा हा कार्यकर्ता असतो. आत्माच उडून केला तर बाकी काहीच शिल्लक राहात नाही. त्यामुळे ज्यावेळी एकनाथ शिंदे यांच्यासह इतर आमदार फुटले त्याच वेळी मनधरणी करून परत घरट्यात आणणे आवश्यक होते. हीच पहिली चुक भोवली. त्यानंतर मजबुत पाठबळ नसताना मुख्यमंत्री बनवुन कायमचे जनतेच्यामनातून उतरविले. आता बाकी काय शिल्लक राहीले तर खासदार! नवु पैकी सहा एकनाथ शिंदे यांच्याकडे गेले बाकी काय शिल्लक राहीले तीन! त्यामुळे आमदार फुटू नये म्हणून त्यांचा राज्यात दौरे चालु आहेत असे समजले जाते. ते काही चुकीचे नाही ते बरोबर आहे. वास्तविक राज्यातील राजकिय घडामोडीचा विचार केला तर एक बाब लक्षात येते विरोधक हा मजबुत नाही. संख्याबळ नाही. सत्ताधाऱ्यास हात दाखवयाचा झाला तर ते शक्य नाही. त्याच प्रमाणे विरोधकात उद्धव ठाकरे तेवढेच मजबुत आहेत. काँग्रेसमधे किंवा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जनतेवर प्रभाव टाकणारा नेता दिसून येत नाही. काँग्रेसमध्ये एकापेक्षा एक दिग्गज होते ते एकतर संपले दुसरे असतील ते घराबाहेर काँग्रेस वाचविण्यासाठी प्रयत्न करीत नाहीत. ही वस्तूस्थिती आहे. सहा पैकी सर्वात लोकप्रिय खासदार धाराशिवचे ओमराजे निंबाळकर आहेत. ते शिंदे गटाकडे गेले. त्यांच्यावर उद्धव ठाकरे गटाकडून खालच्या स्तरावर टिका होताना दिसून येत आहे. ते योग्य नाही. वास्तविक ज्यावेळी केंद्र सरकारमध्ये मंत्रीमंडळाचा विस्तार होईल त्यावेळी ओमराजे निंबाळकरांचा नंबर लागेल. आगामी काळात सुद्धा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतूनच ओमराजे यांना उमेदवारी द्यावी लागेल. भाजपाला यदाकदचित माघार घ्यावी लागेल किंवा त्या बदल्यात इतर इतर ठिकाणाचा मतदारसंघ मागून घ्यावा लागेल. वास्तविक खा. ओमराजे यांच्यात कोणतीही उणीव नाही. ते प्रचंड जनतेच्या संपर्कात असतात. दुसरे कोणतेही खासदार एवढे संपर्कात नसतील असे दिसून येते. आपल्या चुकीमुळे आपल्या पायावर दगड मारून घेतल्यास ईतरांना दोश देणे योग्य नाही. त्यामुळे आज जे घराबाहेर उद्धव ठाकरे बाहेर पडले ते योग्य आहे. यामुळे किमान आमदार एकसंघ राहातील असे दिसून येते. आगामी काळात ऑपरेशन टायगर आमदाराबाबत घडण्याची शक्यता आहे. असो यापुर्वीच उद्धव ठाकरे घराबाहेर पडून मोठ्या प्रमाणात जनतेच्या संपर्कात असते तर आज परिस्थिती चांगली राहीली असती. राज्यात जे आलिकडील काळात घडत आहेत ते योग्य नाही. सध्या चर्चा खासदार फुटल्याची आहे. या अगोदर पेपर फुटीची चर्चा होती आता खासदार फुटीची होताना दिसून येत आहे. उद्धव ठाकरे म्हणजे ठाकरे परिवारांना मानणारा वर्ग मोठा आहे. ठाकरे परिवाराचे राज्यासाठी योगदान मोठे आहे. राज व उद्धव ठाकरे यांच्याबाबतजनतेच्या मनात श्रद्धा आहे ती टिकवयाची का नाही हे या दोघांनी ठरावयाचे आहे. आज जे संजय राऊत बोलतात ते योग्य नाही. जिभ सांभाळून बोलले पाहिजे. एकनाथ शिंदे सह आमदार दुर गेले त्यावेळी त्यांनी अगोदर दुपारी खासदारकी साठी मतदान केले. नंतर ते सोडून गेले. त्यावेळी संजय राऊतांना खासदार बनविण्याचे नाही असे ठरविले असते तेही त्यांनी शक्य करून दाखविले असते. ते खुद्दारच आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आता तीनच खासदार उरले आहेत किती वाईट आवस्था झाली आहे. आमदार दूर जावू नये यासाठी जो प्रयत्न चालू आहे हे जनतेला कळून आला आहे. त्यामळे जो प्रयत्न चालू आहे तो योग्यच आहे. राहीला प्रश्न सोडून गेलेल्या खासदारावर अतिटिका करणे योग्य नाही. टिका ही मर्यादित असावी. त्यांच्याबाबत अपशब्द वापरणे म्हणजे त्या खासदारकीच्या मतदार संघाचा अपमान आहे हे लक्षात घेतले पाहिजे. मुळात सहा खासदार का दूर गेले याचा अभ्यास करावा त्यात सुधारणा करावी. नेत्यांनी एक बाब लक्षात ठेवावी की, जनतेचा संपर्क तुटला, कमी झाला की, उतरती कळा लागली. तेच घडत आहे. आता देशभर भाजपा पॉवरफुल्ल बनत आहे ही वस्तूस्थिती आहे. त्याच्या सोबतीला राज्यात एकनाथ शिंदे यांची शिवसेना आहे ती आज दोन नंबरला समजली जाते. मग सांगा ज्या एकनाथ शिंदे यांची नजर गोव्याकडे वळली आहे त्यामुळे त्यांचे नियोजन मजबुत आहे. जे खासदार दूर गेले ते एका दिवसात नाही. हे राजाला कळाले नाही हेच मोठे दुर्दैव आहे. आता दूर गेलेल्यांना शिव्या घालून काही उपयोग नाही. सर्व काही सेटलमेंट होवून निर्णय झालेले असतात. त्यामुळे काही तरी आपशब्द बोलून आपली प्रतिमा खराब करून घेण्यात काहीच अर्थ नाही. फिनीक्स पक्षाप्रमाणे राखेतून विश्वनिर्माण करण्याचा प्रयत्न करावा. तसे स्वप्न पाहावे. दोन खासदार संसदेत असलेला पक्षाच्या ताब्यात बारावर्षापासून पंतप्रधानपद आहे. देशात अनेक राज्य जिंकत आहे याचा विचार कधी करणार. त्यामुळे कडक टिकेपेक्षा परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे.

# कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर

मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (ऊडउ) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल वर तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे. कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे.

एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे . आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल,

या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

**काशीबाई थोरात –धायगुडे**
**(वरिष्ठ सहायक संचालक)**

# राज्यात पावसाळी मासेमारी बंदी १५ ऑगस्टपर्यंत - मंत्री नितेश राणे



मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील मत्स्यसाठ्याचे संवर्धन, माशांना प्रजननासाठी अधिक कालावधी उपलब्ध करून देणे, तसेच पावसाळ्यातील खराब हवामानामुळे मच्छीमारांची जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी राज्य शासनाने पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी वाढवून १५ ऑगस्टपर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे दिली.

यापूर्वी राज्याच्या जलधी क्षेत्रात १ जून ते ३१ जुलै या ६१ दिवसांच्या कालावधीत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना बंदी होती. पश्चिम मान्सूनचे आगमन, मत्स्यसाठ्याचे संरक्षण आणि मच्छीमारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र, मासेमारी हंगामाच्या सुरुवातीला लहान माशांची होणारी मासेमारी रोखण्यासाठी बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढवावा, अशी मागणी विविध मच्छीमार सहकारी संस्थांकडून शासनाकडे करण्यात आली होती. या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा समिती तसेच राज्य सल्लागार व सनियंत्रण समितीचे अहवाल मागविण्यात आले. या समित्यांनीही बंदीचा कालावधी १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्याचा अभिप्राय दिला.

शासनाच्या मते, वाढीव बंदीमुळे मत्स्यसाठ्याचे जतन व संवर्धन होण्यास मदत होईल. तसेच माशांना प्रजननासाठी पुरेसा कालावधी मिळेल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मत्स्यसंपदा टिकवून ठेवणे शक्य होईल. याशिवाय पावसाळ्याच्या सुरुवातीला येणारे वादळी वारे, चक्रीवादळे, अवकाळी पाऊस आणि खराब हवामानामुळे होणारी संभाव्य जीवित व वित्तहानीही टाळता येणार आहे.

दरम्यान, राज्यात बंदी लागू असताना इतर राज्यांतील मासेमारी नौका महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर येऊन अनधिकृत मासेमारी करत असल्यास त्यांच्याविरुद्ध मत्स्य विभागाकडून कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री राणे यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

महाराष्ट्राची संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांला पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'. ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

**महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात**

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी 'महाकर्जमुक्ती योजना' म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे.




या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

**योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ**

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे : **यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती :** जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

**एकवेळ समझोता योजना (OTS) :**

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (जढड) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन : अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता**

कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे.

सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन :** आधार प्रमाणिकरण अनिवार्य शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे. पात्र शेकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. एकवेळ समझोता (जढड) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

**तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा**

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

**प्रशासकीय समन्वय**

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळीराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

**–काशीबाई थोरात–धायगुडे,**
**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**

# बर्की धबधबा, कोल्हापूर





धरणीमाता हिरवा शालू लेण्यासाठी पावसाची वाट पहात असते. डोंगरदऱ्यांमध्ये पडणारा धुवाँधार पाऊस, त्यामुळे डोंगरकपारीमधील छोटया-मोठया कपारीमध्ये निर्माण होणारे ओहोळ आणि हे ओहळ कोसळल्यामुळे त्याचे झालेले धबधब्यातील रुपांतर, त्याचा झुळझुळणारा खळाळत जाणारा आवाज आपल मन गुंतवून टाकतो. आणि हे पाणी सर्व डोंगरदर्यांना हिरवा शालू कधी लपेटून देतो, ते आपल्याला कळतच नाही. कोल्हापूरनगरी महालक्ष्मीचे अधिष्ठान, शिवरायांची स्नुषा ताराराणी त्यांनी स्थापन केलेली मराठयाची ही नगरी म्हणजे कोकण आणि घाट माथा यांचा सुंदर संगम आहे. पर्यटकांना भुरळ घालतील अशा अनेक स्थळांचं आगर या जिल्ह्यात आपणाला येण्याचा आग्रह करीत आहे. अशाच एका पावसाळी पर्यटन स्थळा विषयी जाणून घेऊ.

निसर्गाची ओढ मानवी मनाला नेहमीच भुरळ घालत आलेली आहे. पावसाळ्यात तर निसर्गाचे सौंदर्य नेहमीच खुलते. हिरवाई, ऊन-पावसाचा लंपडाव, येणारी एखादी सर, गवताच्या पात्यावरचे दवबिंदू, त्यावर पडलेले सोनेरी किरण मनाला मोहवतात. शाहुवाडी जवळील बर्की या छोटयाश्या गावाजवळ सह्याद्रीच्या रांगामध्ये हा धबधबा निर्माण झालेला आहे. या परिसरात हा बर्की धबधबा म्हणून ओळखला जातो. पावसाळी पर्यटनाचे बेळगाव, सांगली, कोल्हापूर परीसरातील पर्यटकांचे हे आवडते ठिकाण आहे.

हजारो पर्यटक दरवर्षी येथे स्नानाचा आनंद घेण्यासाठी येत असतात. निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेत असतांना, धबधब्याखाली भिजणे, म्हणजे स्वर्गीय अनुभव आहे. निसर्गाचा मुक्त अविष्कार पाहून आपले मन प्रसन्न होते. आणि एक वेगळी ऊर्जा पुन्हा आपली नेहमीची दैनंदिन कामे करण्यास यामुळे प्राप्त होते.

कोल्हापूरपासून ५६ कि. मी. अंतरावर हा धबधबा आहे. या ठिकाणी बाजारभोगाव- करंजफेणमार्गे किंवा मलकापूर-येळवण यामार्गे येथे आपण पोहोचू शकतो. धबधबा पाहण्यासाठी मात्र ३ कि. मी. पायी जावे लागते. धबधब्याकडेही जात असताना हिरवे डोंगर, दर्या, ओढे-नाले, डोलणारी झाडे-फुले-पाखरे अशी निसर्गाची किमया आपल्या दृष्टीस पडते. दाट जंगलातून पायी जात असतांना छोट-छोटे ओढे पार करताना होणारा पाण्याचा स्पर्श; एक वेगळी अनुभूती देतो. घेश्रहर्ीि चरहरश्रराळभरपावसात अंगाला येणारा घामाचा दर्प, शिणवटा मात्र हा निसर्ग पहात असतांना कुठल्याकुठे दूर पळून जातो, ते कळतच नाही. मात्र यावेळी एक खबरदारी घ्यावी लागते. ती म्हणजे, वाटेत पाण्यातील जळवापासून सावध राहिले पाहिजे. धबधब्याजवळ पोहचताच शुभ्र जलधारा पाहून आपलं मन मोहरुन तर जातच, रसिक माणसांच्या मनात तर काव्यपंक्तीच येतील अशी, ही निसर्गाची किमया आहे. डोळ्याचे पारणे फिटेल असे हे, दृश्य मनाला उभारी देते. पर्यटक क्षणभर हे दृष्य पाहून थक्कच होतात. कोसळणार्या पाण्याच्या संगीतावर येणारे विविध पशु-पक्ष्यांचे आवाज एका वेगळ्याच संगीताची निर्मिती करत असतात. त्यातच सदाहरीत वृक्षवेलींनी चौहो बाजूंनी दिलेला वेढा, असे हे सारे वातावरण आपणाला एक वेगळीच ऊर्जा देत, मन ताजेतवाने करते.

शाहुवाडी तालुक्यातील फारशी वर्दळ नसलेले हे ठिकाण पावसाळ्यातील चार महिने पर्यटकांना आकर्षित करत असते.

## झोपेच्या कमतरतेचा शरीरावर कसा परिणाम होतो



दिवसातून ६ तासांपेक्षा कमी झोपणे हे तुमच्या आयुष्यातील एक सामान्य वैशिष्ट्य असेल, तर तुम्ही हा लेख आत्ताच वाचला पाहिजे. झोपेच्या कमतरतेमुळे तुमच्या शरीरावर तुम्ही कल्पनेपेक्षा जास्त परिणाम करू शकतात. काम. ऑनलाइन जीवन. कुटुंब आणि मित्र. आपले जीवन या घटकांमध्ये इतके अडकते की आपण पुरेशा झोपेच्या रूपात आपल्या शरीराला पुरेशी विश्रांती देण्यास विसरतो. झोपेचा अभाव तुमच्या शरीराला शांतपणे कसे हानी पोहोचवते ते येथे आहे:

**१. वजन वाढण्याचे दुखणे**

तुमची झोप कमी झाली की तुम्ही लठ्ठपणाला आमंत्रण देतो. असे म्हटले जाते की जेव्हा तुमच्या शरी-राला कमी झोप लागते तेव्हा तुम्हाला जास्त भूक लागते आणि त्यामुळे जास्त खाणे. हे हार्मोनल असंतुलनामुळे होते. आपली भूक (घरेलीन) उत्तेजित करणारे संप्रेरक वाढते तर भूक नियंत्रित ठेवण्यास मदत करणारे रसायन (लेप्टिन) कमी होते.

२. **मधुमेहाचा धोका**–मधुमेह टाळण्यासाठी आपल्या आहारावर लक्ष ठेवणे आणि व्यायाम करणे महत्वाचे आहे. परंतु तुम्हाला हे फारसे माहीत नाही की जेव्हा तुम्ही कमी झोपता तेव्हा तुमच्या रक्तप्रवाहातील ग्लुकोजवर प्रक्रिया करण्याची तुमच्या शरीराची क्षमता बाधित होते. अशाप्रकारे, तुम्हाला टाइप २ मधुमेह होण्याची अधिक शक्यता असते.

**३. झोप सोडून द्या एक बीट सोडून द्या**

दीर्घकाळात, दिवसातून ६ तासांपेक्षा कमी झोप घेतल्याने तुम्हाला हृदयविकार होण्याची शक्यता २ पटीने वाढू शकते. असे घडते कारण झोपेच्या कमतरतेमुळे तुमच्या हृदयाचे ठोके बदलतात आणि तुमचे शरीर आरामशीर नसल्यामुळे तुमचा रक्तदाब वाढतो. उच्च रक्तदाब

**(क्रमशः**

# तो राम आम्हाला देतो रे!

सत्ता आणि संपत्ती यांचा त्याग केल्याने श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम ठरले. त्यांचा कित्ता गिरवला पाहिजे, असे राम नामाचा उद्घोष करणार्यांना वाटत नाही. रामामुळे सत्ता मिळाली हे त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे.

अयोध्येतील पोलिसांनी आठ जणांना अटक केली आहे. ते सर्वजण तेथील राम मंदिरातील किंवा त्याची व्यवस्था बघणार्या संस्थेचे कर्मचारी आ-हेत. भाविकांनी मंदिरात वाहिलेल्या रोख रकमेत अफरातफर झाली, दागिने व मौल्यवान धातूच्या भेटी नाहीशा झाल्या अशा तक्रारीवरून दाखल झालेल्या गुन्ह्यावरून (एफआयआर) पोलिसांनी ही कारवाई केली. त्यांच्या तपासात आठ पैकी सात जणांकडून ७९ लाख ८० हजार रुपये जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. ज्या रकमेचा गैरव्यवहार किंवा अफरातफर झाल्याचा आरोप आहे, त्या तुलनेत ही रक्कम अगदीच किरकोळ आहे. अटक केलेल्यांपैकी सहा जणांवर मंदिरात आलेल्या रकमेची किंवा मौल्यवान वस्तूंची मोजदाद करण्याची जबाबदारी होती. त्यापैकी एक टिन्नू यादव पूर्वी चंपत राय यांचा वाहन चालक होता. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट या नावाची विश्वस्त संस्था या मंदिराची व्यवस्था बघते. चंपत राय या संस्थेचे सर चिटणीस होते. आर्थिक गैर व्यवहाराचे आरोप झाल्याने विशेष तपास पथकाची स्थाप-ना झाल्यानंतर त्यांनी पद सोडले आहे. या राम मंदिराची उभारणी आणि त्याचे उद्घाटन यात त्यांचा वाटा मोठा होता. किंबहुना त्यांना मंदिर उभारणीचा 'चेहेरा' मानले जात होते. ते मूळचे विश्व हिंदू परिषदेचे आहेत. मंदिर आणि सत्ता

देणग्यांच्या हा- मंदिरास मिळणार्या रोख रकमेच्या अथवा दागिन्यांच्या स्वरूपातील ताळणीत 'अनियमितता' होत असल्याचे सर्व प्रथम महिपाल सिंग यांनी उघड केले. 'ट्रस्ट'च्या हिशेबनीसांच्या (अकौंटट) पथकावर देखरेख करण्याची जबाबदारी सिंग यांच्यावर होती. त्यांनी तक्रार केल्यानंतर त्यांच्याकडून ती जबाबदारी काढून घेण्यात आल्याचे सिंग यांनी जाहीररीत्या म्हटले आहे. आपल्याला धमक्या येत असल्याचे आता ते सांगत आहेत. राम मंदिर जुने नसले तरी त्या जागेचा इतिहास जुना आहे. मूळचे मंदिर पाडून बाबर या मुघल बादशहाने तेथे मशीद बांधली, असा समज प्रचलित आहे. राम जन्मभूमी 'मुक्त' करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवानी यांनी रथयात्रेद्वारे मोहीम सुरू केली. बाबरी मशीद पाडली जाणे, त्या जमिनीचा न्यायालयात अनेक वर्षे चाललेला खटला, तेथे मंदिर उभारण्यास मिळालेली परवानगी हा ताजा इतिहास सर्वांना माहीत आहे. या मोहिमेमुळे भाजपला बळ मिळाले व केंद्रात सत्ता मिळाली. अडवानी यांना मात्र विजनवासात जावे लागले हा भाग वेगळा. या संपूर्ण मोहिमेत भाजपची मातृ संस्था रा.स्व. संघ व विश्व हिंदू परिषद सक्रिय होती. त्यामुळे मंदिराच्या कामकाजात चंपत राय यांच्या सारख्यांना महत्त्वाचे स्थान मिळणे स्वाभाविक होते. मंदिरात रामाच्या मूर्तीची स्थापना २०२२ मध्ये झाली. त्यानंतर दररोज हजारो भाविक मंदिरास भेट देतात. २०२४-२५ या वर्षात मंदिराचे उत्पन्न सुमारे ३ अब्ज २७ कोटी रुपये असल्याचे एक वृत्त आहे. सुमारे ७ कोटी रुपये 'गायब' झाल्याचा आरोप अयोध्येतील एका माजी स्थानिक नेत्याने केला होता. तो चंपत राय यांनी फेटाळला होता. येणारी रक्कम, दगिने किंवा मौल्यवान धातू यांच्या मोजणीवर संस्थेचे आणि बँकेच्या अधिकार्यांचे लक्ष असते असे ते म्हणाले होते. नंतर समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी गैर व्यवहाराचा आरोप केल्यानंतर राजकीय वाद सुरू झाला. त्याची दखल घेऊन राज्य सरकारला विशेष तपास पथक स्थापणे भाग पडले. देवस्थानांमधील रक्कम किंवा दागिने यांचा अपहार होण्याचा आरोप होण्याची ही पहिली वेळ नाही. त्यांची कधी चौकशी होते किंवा होतही नाही. चौकशी झाली तरी त्याचा निष्कर्ष समजत नाही. अयोध्येतील चौकशीचा निर्णय कधी व काय लागेल हे त्या श्री रामालाच माहीत. पुढील वर्षी उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणूक होत आहे. त्या आधी असे आरोप झाल्याने आपल्या प्रतिमेची चिंता राज्य सरकार व भाजपला जास्त आहे. अपहार झाला असल्यास तो किती मोठा आहे, किती वर्षे तो सुरू आहे हे जनतेस समजले पाहिजे. कारण, भाजपच्या भाषेत हा मुद्दा 'आस्थे'चा, म्हणजे श्रद्धेचा आहे.



## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

प्रणयक्रिडा हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्वाचा घटक असतो. यामुळे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. तसेच मानसिक संतुलनही उत्तम राहते. पण, काही पुरूरुषांना ही इच्छा कमी असते. यामागे अनेक कारणे आहेत. या कारणांमुळेच पुरुषांना सेक्सचा आनंद लुटता येत नाही. याचे मुख्य कारण खाली देण्यात येत आहे.

**१) टेस्टोस्टेरोनची कमतरता–**हॉर्मोन्स टेस्टोस्टेरोनची कमतरता हे प्रणयाची इच्छा कमी होण्या मागचे प्रमुख कारण आहे. साधारण वयाच्या ४० व्या वर्षानंतर पुरूषांच्या रक्तामधील टेस्टोस्टेरोनची मात्रा

## २ Joke विनोद




छोटी सुमन बाबांना विचारते, ङ्गबाबा लोणचे फार महाग असते का?फ बाबा म्हणतात, ङ्गनाही, पण तू का विचारतेस?फ सुमन रडत रडत म्हणते, ङ्गसकाळी माझ्या हातून थोडसे लोणचे तुमच्या नव्या सदऱ्यावर सांडले तर आई केवढे ओरडली.

## ३ Message संदेश



Teacher: raju, tum kis liye college aate ho?
Student: vidya ke khaatir
Teacher: toh ab so kyu rahe ho?
Student: aaj vidya nahi aayi hai sir

## ४ Thought सुविचार




नम्रता हा माणसाचा खरा दागिना आहे.
-सर्वेंटिस

### संस्कृत सुभाषित

वासनाना क्षयश्चात स्वाध्मासापनमं करू
अर्थ- मन निरंतर स्वस्वरुपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो.
म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

### उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

### आडवे उत्तर

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

### उभे उत्तर

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### आयर्लंडविरुद्धच्या पराभवानंतर भारतीय संघ पुढची मालिका कोणाविरुद्ध खेळणार?

मुंबई –भारतीय क्रिकेट संघासाठी एका नव्या पर्वाची सुरुवात झाली असली तरी ही सुरुवात फारशी चांगली झालेली नाही. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली, टीम इंडियानं आयर्लंडविरुद्धची दोन सामन्यांची टी–२० मालिका गमावली. आता, टीम इंडिया पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेसाठी आणि त्यानंतर वनडे सामन्यांसाठी इंग्लंडला जाणार आहे. ही मालिका १ जुलैपासून सुरु होणार आहे.
भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची टी–२० मालिका : भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची टी–२० मालिका १ जुलै, म्हणजेच बुधवारी सुरु होईल. मालिकेतील पुढील सामना शनिवार, ४ जुलै रोजी खेळला जाईल. मालिकेतील तिसरा सामना मंगळवार, ७ जुलै रोजी खेळला जाईल. चौथा सामना गुरुवार, ९ जुलै रोजी तर मालिकेतील पाचवा आणि अंतिम सामना ११ जुलै रोजी खेळला जाईल, ज्या दिवशी मालिका संपेल.
भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका : भारतीय संघाचा दौरा यानंतरही संपणार नाही. तीन सामन्यांची वनडे मालिका खूप महत्त्वाची ठरणार आहे.

### आयर्लंडच्या मुख्य प्रशिक्षकाचा अचानक राजीनामा

**मुंबई–**बेलफास्टमध्ये भाराताविरूद्ध झालेल्या दोन सामन्यांच्या टी–२० मालिकेत यजमान आयर्लड संघाने पहिल्यांदाच विजय मिळवला. भाराताविरूद्ध मिळवलेला या ऐतिहासिक निर्भेळ मालिका विजय आयर्लडच्या क्रिकेट इतिहासातील ऐतिहासिक क्षण ठरला. आपल्या घरच्याच मैदानावर टी–२०विश्वचषक विजेत्या भारताचा पराभव करणं म्हणजे आयर्लंड संघासाठी जणू सोहळा होता. संघ या विजयाचा आनंद साजरा करत असतानाच अचानक आयर्लंडच्या कोचने प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे.आयर्लंडच्या पुरुष क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक हेन्रिक मलान यांनी सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. गेली चार वर्षांहून अधिक काळ संघाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या टी–२० मालिकेत २–० असा ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर अवघ्या एका दिवसात त्यांनी ही घोषणा केली.
४५ वर्षीय मलान यांची २०२२ मध्ये आयर्लंडच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली होती. त्यांच्या कार्यकाळात आयर्लंडने सलग तीन टी–२० विश्वचषकांसाठी पात्रता मिळवली, कसोटी क्रिकेटमधील पहिले तीन विजय नोंदवले.

### असा कोच नकोच!टीम इंडियाच्या पराभवानंतर गौतम गंभीरची उडवली खिल्ली

मुंबई–भारत विरुद्ध आयर्लंड यांच्यामध्ये काल सामना पार पडला, या सामन्यात भारताच्या संघाला आयर्लंडने सलग दोन सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. टीम इंडियाला दोन सामन्यांमध्ये झालेल्या पराभवानंतर टीम इंडियाने मालिका देखील गमावली आहे. भारताच्या या दोन्ही सामन्यातील पराभवानंतर टीम इंडियाला आता सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात ट्रोल केले जात आहे. आयर्लंडविरुद्ध मालिकेमध्ये संघाच्या खराब कामगिरीनंतर श्रेयस अय्यर आणि कोच गौतम गंभीरवर सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात टीका केली जात आहे. आयर्लंडविरुद्धच्या पराभवानंतर आता आइसलँड क्रिकेट बोर्डाने गौतम गंभीरची खिल्ली उडवली आहे. आता सोशल मिडियावर भारतीय संघाचा पराभव झाल्यानंतर आइसलँड क्रिकेट बोर्डाने गौतम गंभीरने आपल्या संघाचे मुख्य प्रशिक्षक व्हावे अशी आपली इच्छा नाही, असे त्याने स्पष्ट केले आहे. ही पोस्ट सोशल मिडियावर केल्यानंतर काही क्षणातच व्हायरल झाली आहे. आइसलँड क्रिकेट बोर्डाने टीम इंडियाचा झालेल्या पराभवानंतर सोशल मिडियावर लिहीले आहे.

### स्टोक्सला क्रिकेटचा शेवटचा दिवसही जखम देऊन गेला... घरच्या मैदानातच इंग्लंडच्या माथी 'कलंक'!

मुंबई–इंग्लंडचा महान ऑलराऊंडर बेन स्टोक्सचं इंटरनॅशनल करिअर पराभवासोबतच संपले आहे. नॉटिंघमच्या ट्रेन्ट ब्रीजमध्ये झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडने इंग्लंडचा १६० रननी पराभव केला आणि सीरिज २–१ ने जिंकली. न्यूझीलंडने याआधी इंग्लंडविरुद्ध त्यांच्याच जमिनीवर १९८६, १९९९ आणि २०२१ सालीही टेस्ट सीरिज जिंकली होती, पण २०२१ ची सीरिज फक्त २ मॅचची होती.ट्रेन्ट ब्रीज टेस्टच्या चौथ्या दिवशी बेन स्टोक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यामुळे इंग्लंडची टीम त्यांच्या कर्णधाराला विजयाचं गिफ्ट देईल, अशी अपेक्षा चाहत्यांना होती, पण न्यूझीलंडने उत्कृष्ट कामगिरी करून इंग्लंडच्या स्वप्नांवर पाणी फिरवलं.
इंग्लंडला या सामन्यात विजयासाठी ३७३ रनचं आव्हान मिळालं होतं. पाचव्या दिवसाची सुरुवात इंग्लंडने १०३४ अशी केली होती. यानंतर न्यूझीलंडच्या बॉलरनी दबाव बनवून ठेवला.

## अर्जेंटिनाचा बाद फेरीत प्रवेश; जॉर्डनचा ३–१ ने केला पराभव

डलास : अर्जेंटिनाचा स्टार लिओनेल मेस्सी सलग सात विश्वचषक सामन्यांमध्ये गोल करणारा जगातील पहिला फुटबॉलपटू ठरला. रविवारी झालेल्या जे गटातील सामन्यात तो जॉर्डनविरुद्ध बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला आणि ८० व्या मिनिटाला फ्री–किकवर गोल केला. डॅलस स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात मेस्सीच्या गोलमुळे अर्जेंटिनाने जॉर्डनवर ३–१ ने विजय मिळवला. या विजयामुळे अर्जेंटिनाने गट 'जे' मध्ये अव्वल स्थान मिळवले आणि बाद फेरीमध्ये प्रवेश केला. संघाने लीग टप्प्यातील तिन्ही सामने जिंकून नऊ गुण मिळवले. अल्जेरिया आणि ऑस्ट्रियाविरुद्धचा सामना ३–३ असा बरोबरीत सुटला.
त्याने फ्री–किकद्वारे एक विशेष विक्रमही नोंदवला गेला. हा मेस्सीच्या कारकिर्दीतील ७२ वा आणि अर्जेंटिनासाठी १२ वा फ्री–किक गोल होता. विश्वचषकातील हा त्याचा दुसरा फ्री–किक गोल होता. यासह, विश्वचषकात दोन फ्री–किक गोल



करणार्या पेले, रिव्हलिनो, टेओफिलो कुबिलास, बर्नार्ड झेंघिनी आणि डेव्हिड बेकहॅम या खेळाडूंच्या पंक्तीत तो सामील झाला.मेस्सीने आता या विश्वचषकात सहा गोल केले आहेत. तो गोल्डन बूटच्या शर्यतीत किलियन एम्बाप्पे, व्हिनिसियस ज्युनियर आणि अर्लिंग हालंड यांच्यापेक्षा दोन गोलने पुढे आहे. इतकेच नाही तर, मेस्सीने विश्वचषकातील आपला १९वा गोल करून पुरुष विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक गोल करण्याचा आपला विक्रमात वाढ केली.
सेल्सो आणि मार्टिनेझ यांचेही गोल
जिओव्हानी लो सेल्सोने १९व्या मिनिटाला फ्री–किकद्वारे अर्जेंटिनाला १–० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर लॉटारो मार्टिनेझने ३१व्या मिनिटाला पेनल्टीद्वारे मध्यंतराआधी ही आघाडी दुप्पट केली. या दोन्ही खेळाडूंचा हा पहिला विश्वचषक गोल होता.
दुसर्या सत्राच्या सुरुवातीला मैदानात उतरलेल्या मौसा अलातमारीने ५५ व्या मिनिटाला गोल करून जॉर्डनचे खाते उघडले. मात्र, अर्जेंटिनाने सामन्यावर आपले नियंत्रण कायम ठेवले. पहिला विश्वचषक खेळणार्या जॉर्डनला तिन्ही सामन्यांत पराभव पत्करावा लागला आणि ते स्पर्धेतून बाहेर पडले.

## जर्मनीला मोठा धक्का! पॅराग्वेने पेनल्टी शूटआऊटमध्ये केला पराभव



### विश्वचषकातून जर्मनीचा धक्कादायक एक्झिट

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये सर्वात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. चार वेळचा विश्वविजेता जर्मनीला पॅराग्वेने पेनल्टी शूटआऊटमध्ये ४–३ ने पराभूत करत स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवला. निर्धारित आणि अतिरिक्त वेळेत सामना १–१ असा बरोबरीत राहिल्यानंतर झालेल्या थरारक पेनल्टी शूटआऊटमध्ये पॅराग्वेने इतिहास रचला.
विशेष म्हणजे, विश्वचषकाच्या इतिहासात जर्मनीची पेनल्टी शूटआऊटमधील ही पहिलीच पराभवाची नोंद ठरली. सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये पॅराग्वेने आक्रमक खेळ करत जर्मनीवर दबाव निर्माण केला. ४५ व्या मिनिटाच्या सुमारास ज्युलिओ एन्सिसोने शानदार हेडरद्वारे गोल करत पॅराग्वेला १–० अशी आघाडी मिळवून दिली. कॉर्नरनंतर मॅटियास गालाझ्रने दिलेल्या अचूक क्रॉसवर एन्सिसो पूर्णपणे अनमार्क राहिला आणि त्याने संधीचे सोनं केले. एलए ऑलिम्पिकसाठी क्रिकेटच्या पात्रता निकषांना आयओसीची मंजुरी
नवी दिल्ली : लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ साठी क्रिकेटच्या पात्रता प्रणालीला आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या कार्यकारी मंडळाने अधिकृत मंजुरी दिली ...
दुसऱ्या हाफमध्ये जर्मनीने पुनरागमन केले. ५४ व्या मिनिटाला फ्लोरियन विर्ट्झच्या अचूक क्रॉसवर काई हॅव्हर्ट्झने शानदार हेडर मारत बरोबरी साधली. स्पर्धेतील त्याचा हा तिसरा गोल ठरला. त्यानंतर जर्मनीने अनेक संधी निर्माण केल्या, मात्र पॅराग्वेचा गोलरक्षक ऑर्लांडो गिल भक्कमपणे उभा राहिला.
अतिरिक्त वेळेत जोनाथन टाहने हेडरद्वारे गोल केला होता. मात्र व्हीएआर (त–ठ) तपासणीनंतर गोलरक्षकावर फाऊल झाल्याचे स्पष्ट झाल्याने हा गोल रद्द करण्यात आला. हा निर्णय जर्मनीसाठी मोठा धक्का ठरला.
त्यानंतर सामना पेनल्टी शूटआऊटकडे गेला. पॅराग्वेचा गोलरक्षक ऑर्लांडो गिलने काई हॅव्हर्ट्झ आणि निक वोल्टेमाडे यांच्या पेनल्टी रोखत संघाला मोठी आघाडी मिळवून दिली. दुसरीकडे, जर्मनीचा जोनाथन टाह निर्णायक क्षणी पेनल्टी चुकला. त्यानंतर जोसे कॅनालेने अचूक पेनल्टी मारत पॅराग्वेला ४–३ असा ऐतिहासिक विजय मिळवून दिला. हा विजय पॅराग्वेच्या विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठ्या विजयांपैकी एक मानला जात आहे.
विशेष म्हणजे, विश्वचषकाच्या बाद फेरीत पॅराग्वेने याआधीच्या पाच सामन्यांत एकही गोल केला नव्हता. २००२ मध्ये जर्मनीकडून १–० असा पराभव स्वीकारलेल्या पॅराग्वेने तब्बल २४ वर्षांनंतर त्याच जर्मनीला विश्वचषकातून बाहेर फेकत जुन्या पराभवाचा बदला घेतला. ऑस्ट्रेलियाकडून पराभवानंतर भारताचं टी–२० वर्ल्डकपमधील आव्हान संपलं; 'या' चुका ठरल्या निर्णायक आयसीसी (खउउ) महिला टी–२० (ढ२०) वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलियाने भारताचा ६ विकेट्सनी पराभव करत स्पर्धेतील भारताचं आव्हान संपुष्टात आणलं. या विजयासह ...
दुसरीकडे, २०१४ मध्ये विश्वविजेतेपद पटकावल्यानंतर जर्मनीची ही आणखी एक निराशाजनक मोहीम ठरली. २०१८ आणि २०२२ नंतर यंदाही संघाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. यंदा बाद फेरीत प्रवेश करूनही जर्मनीला अखेरच्या ३२ संघांच्या फेरीतच गाशा गुंडाळावा लागला.
आता पॅराग्वेचा पुढील सामना फ्रान्स आणि स्वीडन यांच्यातील विजेत्या संघाविरुद्ध होण्याची शक्यता असून, उपांत्यपूर्व फेरीत आणखी एका बलाढ्य प्रतिस्पर्ध्याचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

## हॅरी केनच्या गोलमुळे इंग्लंड विजयी

न्यूयॉर्क : हॅरी केनने केलेल्या गोलमुळे गट 'एल' मधील या सामन्यात इंग्लंडने पनामाला २–० ने हरवून विश्वचषक स्पर्धेच्या नॉकआऊट फेरीत प्रवेश केला. त्याच गटात क्रोएशियाने घानाला २–१ ने हरवले. दोन्ही संघ पुढील फेरीत दाखल झाले आहेत. इंग्लंडने आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवून पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केले, तर क्रोएशियाने दुसरा क्रमांक मिळवून पुढील फेरीसाठी पात्रता मिळवली. तिसर्या क्रमांकावर असलेल्या घानानेही नॉकआऊट फेरीसाठी पात्रता मिळवली. सर्व गटांमधील अव्वल आठ संघांमध्ये स्थान मिळवून हा संघ नॉकआऊट फेरीत पोहोचला आहे.



## किदांबी श्रीकांतच्या खिलाडू वृत्तीने जिंकली प्रेक्षकांची मने

**कॅलिफोर्निया :** भारताचा माजी जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाचा बॅडमिंटनपटू किदांबी श्रीकांतन यूएस ओपन स्पर्धेत केवळ आपल्या खेळानेच नव्हे, तर खिलाडूवृत्तीनेही प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. कॅलिफोर्नियातील टायटन जिममध्ये झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपांत्य सामन्यात श्रीकांतने जपानच्या युदाई ओकिमोतोवर २२–२०, १५–२१, २१–१९ असा विजय मिळवला. या विजयासह श्रीकांतने गेल्या नोव्हेंबरनंतर प्रथमच बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सामन्याच्या निर्णायक सेटमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आला. नेटजवळच्या एका एक्सचेंजमध्ये श्रीकांतने केलेला शॉट इन (आत) असल्याचे पंचांनी घोषित केले. मात्र, रिप्लेमध्ये शटल लाईनच्या बाहेर पडल्याचे दिसत होते. ओकिमोतोने पंचांच्या निर्णयाला विरोध करत रिव्ह्यूची मागणी केली, परंतु ती फेटाळली गेली. ओकिमोतो हताश झालेला असताना, श्रीकांतने स्वतः पुढाकार घेतला आणि पंचांना धावपट्टीच्या बाहेर पडलेल्या शटलबाबत माहिती दिली. त्यानंतर पंचांनी आपला निर्णय बदलून ओकिमोतोला गुण दिला. श्रीकांतच्या या खिलाडूवृत्तीचे उपस्थित प्रेक्षकांनी मोठ्या उत्साहात कौतुक केले. ७२ मिनिटे चाललेल्या या अटीतटीच्या लढतीत श्रीकांतने पहिल्या गेममध्ये २०–२२ असा विजय मिळवला, तर ओकिमोतोन दुसऱ्या गेममध्ये १५–२१ ने पुनरागमन केले. तिसऱ्या आणि निर्णायक गेममध्ये पुन्हा एकदा चुरस पाहायला मिळाली. श्रीकांतने १८–१३ अशी आघाडी घेतली होती, परंतु ओकिमोतोने जोरदार कमबॅक करत १८–१८ अशी बरोबरी साधली. अशा तणावाच्या क्षणी संयम राखत श्रीकांतने २१–१९ ने गेम जिंकून सामना आपल्या नावावर केला. अंतिम फेरीत आता श्रीकांतचा सामना चायनीज तैपेईच्या 'सु ली यांग'शी होणार आहे, ज्याने दुसऱ्या उपांत्य सामन्यात रौनक चौहानला २१–१७, २१–१९ असे पराभूत केले.

## भारताच्या महिला संघासाठी गुड न्यूज!

## ऑलिम्पिक २०२८साठी मिळाली थेट एन्ट्री, पुरुष संघाला अजून प्रतिक्षा

दिल्ली–महिला टी–२० विश्वचषक २०२६च्या साखळी टप्प्यातून भारतीय संघाला बाहेर पडावं लागलं होतं. ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या करो या मरो सामन्यात टीम इंडियाला पराभव पत्कारावा लागला होता. या घटनेनंतर आता टीम इंडियासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. भारताच्या महिला संघाने २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवल्याची अधिकृत घोषणा आता करण्यात आली आहे. अनेक दशकांनंतर आगामी ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट खेळाचा समावेश करण्यात आला आहे.
आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती यांनी सोमवारी २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटच्या ऐतिहासिक पुनरागमनासाठी पात्रता प्रक्रियेची अधिकृत घोषणा केली. तब्बल अनेक दशकांनंतर क्रिकेटचं ऑलिम्पिकमध्ये पुनरागमन होणार असून, या स्पर्धेपूर्वी प्रथमच घ्ण ऑलिम्पिक पात्रता स्पर्धा आयोजित केली जाणार आहे.
लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये पुरुष आणि महिला अशा दोन्ही टी–२० स्पर्धांमध्ये प्रत्येकी सहा संघ सहभागी होतील. या स्पर्धेत आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या चारही खंडांतील किमान एका संघाला स्थान निश्चित करण्यात आलं आहे, त्यामुळे प्रत्येक खंडाचं प्रतिनिधित्व ऑलिम्पिकमध्ये पाहायला मिळणार आहे.
भारताच्या महिला संघाने लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी मिळवलं थेट तिकीट
पुरुष आणि महिला गटातील प्रत्येकी पाच संघांची निवड विद्यमान आयसीसी स्पर्धांमधील कामगिरी आणि आयसीसी टी–२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीच्या आधारे केली जाणार आहे. ही प्रक्रिया आयसीसीच्या अधिकृत फ्युचर टूर प्रोग्राम नुसार पार पडेल. तर पुरुष आणि महिला गटातील सहावा व अखेरचा संघ २०२७ मध्ये प्रथमच आयोजित करण्यात येणाऱ्या आयसीसी ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेच्या माध्यमातून निश्चित केला जाईल.
दरम्यान, २०२६ च्या महिला टी–२० विश्वचषकातून लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठीचे पहिले चार संघ निश्चित झाले आहेत. आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या प्रत्येक खंडातून सर्वोच्च स्थान मिळवणारे पात्र संघ म्हणून दक्षिण आफ्रिका, भारत, ग्रेट ब्रिटन (इंग्लंडमार्फत) आणि ऑस्ट्रेलिया यांनी ऑलिम्पिकचं तिकीट मिळवलं आहे. प्रत्येक खंडातून केवळ एका संघालाच थेट पात्रता देण्यात आली आहे.
अमेरिका हा २०२८ ऑलिम्पिकसाठी यजमान देश असल्याने पुरुष आणि महिला या दोन्ही गटांमध्ये त्यांना थेट पात्रतेची संधी असेल. मात्र, त्यासाठी ३० जून २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या पात्रता कालावधीत संबंधित आयसीसी टी–२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अमेरिकेचा संघ किमान अव्वल–१५ मध्ये असणं आवश्यक आहे. जर अमेरिकेचा महिला संघ ही अट पूर्ण करू शकला नाही, तर १ मार्च २०२७ रोजीच्या आयसीसी टी–२० क्रमवारीनुसार अद्याप पात्र न ठरलेल्या कोणत्याही खंडातील सर्वोच्च क्रमांकाच्या संघाला पाचवं थेट स्थान दिलं जाईल.
पुरुष गटातही अमेरिकेचा संघ ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अव्वल–१५ मध्ये नसल्यास, अद्याप पात्र न ठरलेल्या सर्वाधिक मानांकित संघाला हे स्थान मिळेल. आयसीसीने अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, पुरुष गटातील उर्वरित पात्रता स्थानांचा निर्णय ३१ डिसेंबर २०२६ रोजीच्या आयसीसी टी–२० क्रमवारीनुसार घेतला जाईल. आफ्रिका, आशिया, युरोप आणि ओशिनिया या खंडांतील सर्वाधिक क्रमांकाच्या पात्र संघांना लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ मध्ये खेळण्याची संधी मिळेल.



# महात्मा बसवेश्वरमध्ये पल्स पोलिओ लसीकरण अभियान संपन्न



**लातूर/प्रतिनिधी:** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,लातूर येथे पल्स पोलिओ लसीकरण अभियानाचा शुभारंभ प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी लसीकरण अभियान केंद्र प्रमुख तथा ग्रंथपाल प्रा.प्रमोद सराफे, प्रा.गणेश बेडगे, प्रा.हेमंत खानापुरे, बालाजी होनराव आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, देशाला कायमस्वरूपी पोलिओ मुक्त ठेवण्यासाठी आणि आपल्या प्रत्येक बालकाचे आरोग्यदायी व सुरक्षित भविष्य घडवण्यासाठी हे लसीकरण अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक पालकाने आपल्या परिसरातील पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजून या राष्ट्रीय जनआरोग्य मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी केले.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये वट पौर्णिमा साजरी



**लातूर/प्रतिनिधी:**मातोश्री कलावती प्रतिष्ठाण संचलीत लातूर परिसरातील लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये वट पौर्णिमा मोठया उस्ताहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, विद्या पाटील यांनी वडाच्या झाडाचे पूजन केले.

या कार्यक्रमाची सुरवात शाळेच्या समन्वयिका नम्रता झांबरे यांनी वट पौर्णिमा याविषयी माहिती दिली. वट पौर्णिमाचे महत्व काय आहे. सर्व विद्यार्थ्यांना वडाच्या झाडाचे अनन्य साधारण महत्व समजवून सांगितले. यावेळी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना वट पौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका दीक्षा गिरी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्नकेले.

# एमसीव्हीसी विभागाचे प्रा. हरिअर गायके यांचा सेवानिवृत्ती समारंभ उत्साहात संपन्न

**बाभळगाव/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील एमसीव्हीसी विभागाचे ज्येष्ठ प्रा. हरिअर गायके यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित करण्यात आलेला स्नेहपूर्ण सत्कार व सेवानिवृत्ती समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. दीर्घकाळ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक व सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला.

सेवानिवृत्ती समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, डॉ. दिपक मुळे , जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन, धाराशिव, महेश कुलकर्णी (डी.एस.डी., विधानसभा उपाध्यक्ष) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी अध्यक्षांसह प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून प्रा. हरिअर गायके यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या समर्पित सेवाकार्याचा गौरव करत त्यांच्या कार्याचा आदर्श नव्या पिढीतील शिक्षकांनी घ्यावा, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यावेळी प्रा. संदिपान चेवले चंद्रकांत पाटील आणि जी पी सूर्यवंशी यांनी आपली शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

यावेळी विविध प्रशासकीय विभागांतील वरिष्ठ अधिकारी, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक, सहकारी व व्यावसायिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये रेणा सहकारी साखर कारखान्याचे संचालक चंद्रकांत पाटील, श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालय, रेणापूरचे प्राचार्य अनिल कुरेवाड, सेवाकर उपआयुक्त, मुंबई राजेशाहेब माने, जिल्हा उपआयुक्त (पशुसंवर्धन) लातूर डॉ. राजकुमार पाटील, बँक ऑफ बडोदा डेअरी, पुणे येथील असिस्टंट डेप्युटी मॅनेजर डॉ. विलास सुनार, महाराष्ट्र व्होकेशनल टीचर्स ऑर्गनायझेशनचे राज्याध्यक्ष भालचंद्र येडवे, भगवान नागरी सहकारी बँकेचे चेअरमन सुभाष पांचपुते, एमएसईबी, लातूरचे इलेक्ट्रिकल इंजिनिअर प्रमोद बुधवळे, उपविभागीय अभियंता विक्रम कोळवे, तसेच सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन), कळंब डॉ. हणमंत गायकवाड व सहकार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर डॉ. रविंद्र गायकवाड यांच्यासह कृषी व पशुसंवर्धन विभागातील अधिकारी, एमसीव्हीसी विभागाचे प्राध्यापक, दयानंद विद्यालय व दयानंद प्राथमिक विद्यालयाचा सर्व स्टाफ, मित्रपरिवार, कुटुंबीय आणि विविध सामाजिक संस्था व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विविध संस्था, संघटना व मान्यवरांच्या वतीने प्रा. हरिअर गायके यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी:** आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**चरण सेवेकरिता समन्वय**

वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश**

आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

**८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती**

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची...'**

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**चरणसेवा म्हणजे काय?**

संत तुकाराम महाराजांनी तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# महावितरणचे संचालक श्री. राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार जाहीर

## 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'कडून ऑगस्टमध्ये गौरव

**मुंबई/प्रतिनिधी:** महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील गेल्या ३७ वर्षांच्या योगदानाची दखल घेत 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेच्या वतीने त्यांना 'एमिनेंट इंजिनियर' हा देशपातळीवरील मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

अमरावती येथे येत्या २१ व २२ ऑगस्टला आयोजित 'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनामध्ये संचालक श्री. राजेंद्र पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या दोन दिवसीय अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. देशाच्या तांत्रिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया'ची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत.

श्री. राजेंद्र पवार यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर महावितरणमध्ये कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता पदापर्यंत काम केले आहे. या ३६ वर्षांच्या कालावधीत प्रामुख्याने ग्रामीण भागातील दऱ्याखोऱ्यांसह घरगुती, शेती, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात नवीन वीजयंत्रणा उभारणे, नवीन वीजजोडण्या आणि सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उल्लेखनीय कामे केली आहेत. एप्रिल २०२५ पासून श्री. पवार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) म्हणून कार्यरत आहे. विद्युत क्षेत्रात श्री. राजेंद्र पवार



यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना आयईआय संस्थेकडून हा मानाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# केशवराज शैक्षणिक संकुलात 'अमृतमहोत्सवी संस्था वर्धापनदिन' उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी:** श्री लातूर, दि.२८ जून : येथील श्री केशवराज शैक्षणिक संकुलात दि.२८ जून २०२६ रोजी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७५ वा म्हणजेच अमृतमहोत्सवी वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रथम संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख यांच्या हस्ते सकाळी ठीक ७:२० वाजता संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.





याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, केशवराज शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, रेनिसन्स सीबीएसई स्कूलच्या शालेय समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण जाधव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख यांनी संस्था परिचय देताना संस्थेची स्थापना आणि संस्थेचा इतिहास यावर प्रकाश टाकला. खऱ्या अर्थाने अनेक माजी शिक्षकांच्या परिश्रमातून व योगदानातूनच संस्थेची उभारणी झाली आहे. यावर्षी संस्था अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. संस्थेच्या या अमृतमहोत्सवी वर्षात प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे कार्य शिक्षकांनी करावे, विद्यार्थ्यांमध्ये संशोधकवृत्ती निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करावेत, आपल्या विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रे पादाक्रांत करावीत, असे कार्य शिक्षकांकडून घडावे. शिक्षकांमधूनही अनेक अभ्यासू शिक्षक निर्माण होऊन संस्थेचा नावलौकिक वाढवावा असे सांगितले. आत्मनिर्भर भारताच्या विकासासाठी सर्वांनी तन-मन-धनाने योगदान द्यावे. 'ज्ञानं कर्म कर्ताच कर्ता सात्विक उच्यते' या उक्तीप्रमाणे सर्वजण ज्ञान देणारे असल्यामुळे आपल्यामध्ये सात्विकता येणे आवश्यक आहे. सात्विक कार्य करून सर्वांनी आपल्या संस्थेचा अमृतमहोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत केशवराज प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे यांनी केले. वैयक्तिक पद्य संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अमिता देशमुख यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता सामूहिक कल्याण मंत्राने झाली. याप्रसंगी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विभागप्रमुख रेखा पुरी, केशवराज शिशुवाटिकेच्या प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी, रेनिसन्स सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या सोनाली दर्डा, सर्व पर्यवेक्षक, संकुलातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संकुलातील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख सुनिता बनसोडे, सहप्रमुख बालासाहेब करपुडे, कार्यक्रम प्रमुख व्यंकटेश माने, क्रीडाशिक्षक प्रयागराज गरुड, गुरुनाथ झुंजारे, व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये वट पौर्णिमा साजरी



**लातूर/प्रतिनिधी:** येथील विशाल नगर परिसरातील मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये वट पौर्णिमा मोठया उस्ताहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांनी वडाच्या झाडाचे पूजन केले. या कार्यक्रमाची सुरवात शाळेच्या प्राचार्या सुमेरा शेख यांनी वट पौर्णिमा याविषयी माहिती दिली. या दिवशी स्त्रिया वटवृक्षाची पूजा करतात. वडाच्या झाडाचे महत्व विद्यार्थ्यांना समजवून सांगितले. यावेळी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना वट पौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बसव प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा परिषद, केंद्रीय प्राथमिक शाळेत २२० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप...



मुरूम (प्रतिनिधी)–बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव २०२६ चे औचित्य साधून मुरूम येथील जिल्हा परिषद प्रशालेत ५ वी ते ८ वीच्या १७० व केंद्रीय प्राथमिक शाळेतील ५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे समाजसेवक तथा अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक विजयकुमार देशमाने, विलास कंटेकुरे,केंद्रीय प्राथमिक शाळा मुख्यध्यापक अशोक बोईनवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. पुराणे म्हणाले ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण क्षेत्रात माघे राहू नये, आपला परिसर कृषी प्रधान परिसर असून शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा गरजू विद्यार्थी असतो तसेच समाजाने जी देणगी आम्हाला दिली ती देणगी समाजापर्यंत प्रामाणिक पोहचवणाची जबाबदारी ही सामाजिक संघटनेची असते आणि ती जबाबदारी पार पाडण्याचा पारदर्शक प्रयत्न करत असून शालेय साहित्यविना विद्यार्थी शिक्षणापासून वंचीत राहू नये यासाठी बसव प्रतिष्ठानच्या माध्यमातून शैक्षणिक उपक्रम हाती घेतला आहे.

यावेळी शिवाजी कवाळे,संतोष कडगंचे,हरिभाऊ माकणे,गणपत पाटील,मोहन राठोड,श्रीमती बिना पोद्दार,श्रीमती संगीता डोकडे,श्रीमती सुनंदा हुल्ले, श्रीमती अल्कादेवी गायकवाड,राजू पवार,नागनाथ कामशेट्टी आदीसह पालक उपस्थित होते.

# परंड्यात मारुती मंदिरावर भक्तिभावात कळसारोहण:

## भवानीशंकर मंदिरात विधिवत सोहळा पार पडला

परंडा (प्रतिनिधी)– भवानीशंकर मंदिरातील काळामारुती मंदिराचा कलशारोहण सोहळा धार्मिक व विधिवत पूजा–अर्चा करून मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या वेळी रूईभर येथील गुरुदेवदत्त अप्पाबाबा महाराज, श्रीक्षेत्र सोनारी येथील श्रीभैरवनाथ गुरू गादीचे महंत पिरयोगी शामनाथजी महाराज, योगी बंडोपंत तांबोळकर यांच्या हस्ते कलशाचे पूजन करण्यात आले. हनुमान मंदिरावर पवनसुत हनुमान की जय, बजरंग बलीचा जयघोष करत कलशारोहण करण्यात आले. या वेळी मंदिराचे विश्वस्त पंडित किशोर महाराज बैरागी, कपिल महाराज बैरागी यांच्या मार्गदर्शनाखाली पंडित रोहन महाराज बैरागी व रमन महाराज बैरागी यांनी धार्मिक षडोपचार तसेच मंत्रोपचार विधी पार पाडला. मागील वर्षी ग्रामदैवत भवानीशंकर मंदिरातील हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार दत्त अप्पाबाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योजक सुरेश कात्रेला यांच्या वतीने करून शिखराचे बांधकाम केले होते. मंदिराच्या शिखरावरील कळस संतोषसिंह ठाकूर करमाळकर यांनी देणगी स्वरूपात अर्पण केला. संतोषसिंह ठाकूर यांनी पंढरपूर येथून आणलेल्या या कळसाची मंडई पेठेतील त्यांच्या निवासस्थानापासून सवाद्य मिरवणूक काढून राममंदिर येथून भवानीशंकर मंदिरात आणला. त्यानंतर विधिवत होमहवन व पूजन करून मंदिराच्या शिखरावर कलशारोहण करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमासाठी उपनगराध्यक्ष समरजितसिंह ठाकूर आदी उपस्थित होते.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

आंबी (प्रतिनिधी)– पोलीस ठाण अंतर्गत दत्तात्रय वय ४२ वर्षे, रा.कार्ला ता. परंडा जि. धाराशिव, भरत वय २९ वर्षे, रा. कार्ला ता. परंडा जि. धाराशिव हे दि.२५.०६.२०२६ रोजी आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे तीन चाकी पॅगो अप्पे टामटमा क्र एमएच १२ पी के ७११५ व पॅगो प्पे टमटम क्र एमएच १२ के पी १५४५ ही वाहने आनाळा येथील हॉटेल शेळवणे समोर रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना आंबी पोलीसांना मिळून आले.
यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये आंबी पो.ठा. येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

# मराठी न शिकविणाऱ्या शाळांवर दंडासह मान्यता रद्द करण्याची कारवाई – मंत्री दादाजी भुसे



मुंबई,(प्रतिनिंधी)–राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे बंधनकारक आहे. मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल. त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल,असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले की, मराठी भाषा सक्तीचा कायदा लागू करण्यात आल्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकविणे अनिवार्य आहे. मराठी विषय शिकविण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक नियुक्त करणेही शाळांसाठी बंधनकारक केले आहे. त्यामुळे शाळा तपासणी व भेटीदरम्यान मराठी विषयाच्या अध्यापनाची तसेच प्रत्येक वर्गातील मराठी परीक्षेची पडताळणी केली जाणार आहे.

अभ्यासक्रमात राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला अधिक स्थान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य नव्या अभ्यासक्रमात अधिक प्रभावीपणे समाविष्ट करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याबरोबरच राज्यातील विद्यार्थ्यांना महापुरुषांचे कार्य आणि विचार अधिक व्यापकपणे समजावेत यासाठी नव्या अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील मानबिंदूंचा इतिहास आणि कार्याचा समावेश करण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमात अधिक व्यापक स्वरूपात समाविष्ट करण्यात आला असून हा इतिहास आता अधिक विस्तृत स्वरूपात देशभरातील विद्यार्थ्यांना शिकविला जाणार असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले.

मराठी भाषा ही राज्याच्या अस्मितेचा विषय असल्याचे सांगत शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले की, राष्ट्रगीतानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सन्मानपूर्वक गायले जावे, याबाबतही शासनाने सर्व शाळांना स्पष्ट निर्देश दिले आहेत.

सदस्य अतुल भातखळकर यांनी या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य वरुण सरदेसाई, सुनील प्रभू, डॉ. नितीन राऊत आणि रत्नाकर गुट्टे यांनी उपप्रश्न विचारात सहभाग घेतला.

# टीईटी पेपरफुटीची सीबीआय चौकशी करा; विरोधकांनी विधान परिषदेत शिक्षणमंत्र्याचा मागितला राजीनामा!

मुंबई,(प्रतिनिधी)– शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणावर महाराष्ट्र विधान परिषदेत सोमवारी विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी, शिक्षणमंत्री दादा भुसे यांची राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांकडून करण्यात आली. यावर चर्चेची मागणी केली असता ती सभापती राम शिंदे यांच्याकडून फेटाळण्यात आल्याने हौदात येत विरोधकांनी जोरदार घोषणा दिल्या, यावेळी झालेल्या गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले.

शिवसेना (ठाकरे) सदस्य अंबादास दानवे, ज. मो. अभ्यंकर, काँग्रेसचे सतेज पाटील, अभिजित वंजारी, यांच्यासह अन्य सदस्यांनी नियम २८९ अंतर्गत कामकाज स्थगित करून या गंभीर विषयावर सविस्तर चर्चा घेण्याची मागणी केली. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एसआयटीमार्फत चौकशी सुरू असल्याचे सांगून दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. मात्र, विरोधकांचे समाधान न झाल्याने सभागृहात जोरदार गोंधळ झाला आणि अखेर सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले.

अंबादास दानवे यांनी नीट परीक्षेच्या पेपरफुटीचा संदर्भ देत, त्या घटनेनंतरही सरकारने टीईटी परीक्षेबाबत आवश्यक खबरदारी घेतली नसल्याचा आरोप केला. भिवंडी येथे टीईटीचा पेपर फुटल्याची घटना ही राज्याच्या परीक्षा व्यवस्थेतील गंभीर अपयश असल्याचे ते म्हणाले.

टीईटी ही शिक्षक होण्यासाठीची पहिली आणि महत्त्वाची परीक्षा असून, अशा परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटणे म्हणजे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील ही परीक्षा असल्याने या प्रकरणाची नैतिक जबाबदारी शिक्षणमंत्र्यांनी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यात वारंवार टीईटी, तलाठी, पोलीस भरती आणि इतर स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटत असल्याने हे संघटित रॅकेट असल्याचा आरोप करत नियम २८९ अंतर्गत सविस्तर चर्चा घेण्याची मागणी त्यांनी सभापतींकडे केली.

**सात लाख विद्यार्थ्यांची साधी परीक्षा सरकारला घेता येत नाही**

सतेज पाटील यांनी टीईटी परीक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घेण्यात येत असल्याने ती पारदर्शक आणि सुरक्षित पद्धतीने घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारची असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, सरकार १३ कोटी जनतेच्या विकासाच्या घोषणा करते; मात्र सात लाख उमेदवारांची परीक्षा देखील व्यवस्थित घेऊ शकत नाही. पुणे महापालिका, विविध विद्यापीठे, नीट आणि इतर भरती परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांचा उल्लेख करत त्यांनी सरकारवर टीका केली. भिवंडी प्रकरणातील सूत्रधार कोण आहेत, त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल झाले आहेत, त्यामागे कोणाचे संरक्षण आहे आणि संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश कधी होणार, याची माहिती सभागृहात द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

अभिजित वंजारी यांनी राज्यात वारंवार पेपरफुटीच्या घटना घडत असल्याने परीक्षा व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे सांगितले. त्यांनी शिक्षक भरती आणि इतर सर्व स्पर्धा परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यासाठी स्वतंत्र परीक्षा आयोग स्थापन करण्याची मागणी केली. स्वतंत्र यंत्रणा निर्माण केल्याशिवाय पेपरफुटीचे प्रकार थांबणार नाहीत, असे ते म्हणाले. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचीही त्यांनी मागणी केली.

ज. मो. अभ्यंकर यांनी सभागृहात तपासातील माहिती मांडली.

**क्यूआर कोड आणि पासवर्ड परीक्षेपूर्वीच बिहारमध्ये पाठविण्यात आले**

ज. मो. अभ्यंकर यांनी टीईटी पेपरफुटी संदर्भातील तपासात समोर आलेल्या काही बाबी सभागृहात मांडल्या. त्यांनी दावा केला की, परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचे क्यूआर कोड आणि पासवर्ड परीक्षेपूर्वीच बिहारमध्ये पाठविण्यात आले होते. पेपर क्रमांक १, २ आणि ३ संदर्भातील माहिती तपासात समोर आली असल्याचे त्यांनी सांगितले.

तपासात अडीच लाख रुपयांचा धनादेश, दिल्लीहून आलेल्या काही संशयितांचा सहभाग आणि इतर पुरावे समोर आल्याचा उल्लेख त्यांनी केला. या परीक्षेला ६.२५ लाख उमेदवार बसले होते. हजारो शिक्षक, कर्मचारी आणि पोलिसांनी मेहनत घेऊनही पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

**एसआयटीमार्फत चौकशी, दोषींना सोडणार नाही – दादा भुसे**

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारच्या वतीने उत्तर देताना, टीईटी पेपरफुटीचा प्रकार पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे उघडकीस आल्याचे सांगितले.मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार एसआयटी स्थापन करण्यात आली असून, अनेक गुन्हे नोंदवून सखोल तपास सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चौकशीत जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. भविष्यात परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक सुधारणा करण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी सभागृहात दिली.

**विरोधकांचे समाधान नाही; सीबीआय चौकशीची मागणी**

मात्र, शिक्षणमंत्र्यांच्या उत्तराने विरोधकांचे समाधान झाले नाही. एसआयटीऐवजी संपूर्ण प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी करण्याची मागणी विरोधकांनी केली. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत विरोधी सदस्यांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केली.गोंधळ वाढल्याने सभापतींना सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले.

# अरे देवा! १७ वर्षांच्या शिव कॉलेजमध्ये कोसळला, हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू, नवी मुंबईतील घटना

नवी मुंबई,(प्रतिनिधी)–नवी मुंबईतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका १७ वर्षीय विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अवघ्या १७ वर्षांच्या मुलाला हृदयविकाराला धक्का आल्यामुळे आश्चर्य आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील कोपरखैरणे सेक्टर–५ येथील विवेकानंद महाविद्यालयात ही घटना घडली. इयत्ता बारावीत शिकणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मृत विद्यार्थ्याचे नाव शिव पाल असे असून तो पावना येथील रहिवासी होता.

नेहमीप्रमाणे सकाळी तो महाविद्यालयात आला होता. सकाळी साडेसातच्या सुमारास महाविद्यालयाच्या तळमजल्यावर त्याला अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि तो खाली कोसळला. शिव पाल अचानक कोसळल्यामुळे एकच गोंधळ उडाला. घटनेनंतर महाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी त्याला तातडीने जवळील खासगी रुग्णालयात दाखल केलं. मात्र, तपासणीअंती डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

दरम्यान, मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणी आणि शवविच्छेदनासाठी वाशी येथील नवी मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेमुळे महाविद्यालय परिसरात शोककळा पसरली असून विद्यार्थ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यात नाविण्यपूर्ण काम करण्याची संधी – पालक सचिव धीरज कुमार

यवतमाळ,–जिल्ह्यात नाविण्यपूर्ण काम करण्याची प्रचंड संधी आहे. या संधीचा फायदा घेवून जिल्ह्यात लोकोपयोगी नाविण्यपूर्ण काम करावे, असे निर्देश पालक सचिव धीरज कुमार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

पालकमंत्री संजय राठोड यांच्या निर्देशानुसार त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत त्यांनी जिल्ह्याचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीला अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, सहायक जिल्हाधिकारी रेवैयाह डोंगरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, उपविभागीय अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पालक सचिव धीरज कुमार पुढे म्हणाले, जिल्हा प्रशासन व इतर विभागांचे काम चांगले सुरु आहे. जिल्ह्यात काम करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासासाठी टीम म्हणून काम करावे. लोककेंद्रीत प्रशासन राबवून शासनाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवाव्यात, असे निर्देश पालक सचिव धीरज कुमार यांनी दिले.

**मिशन उभारी, सुपर ५० उपक्रमाचे कौतुक**

जिल्हा प्रशासनामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'मिशन उभारी' आणि गुणवंत विद्यार्थ्यांना जेईई आणि नीट परीक्षांचे मोफत प्रशिक्षण देण्यासाठीच्या 'सुपर ५०' उपक्रमाचे पालक सचिव धीरज कुमार यांनी कौतूक केले.


**Name of Change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SAMRIN BASHA QURESHI** TO: **SUMAIYA BASHA KURESHI** Hence for this Declaration i will be known by this name and will use **SUMAIYA BASHA KURESHI** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **SAMRIN BASHA QURESHI**
NEW NAME :- **SUMAIYA BASHA KURESHI**
Address - Kureshi Gall Naldurg Taluka Tuljapur
DIST. Osmanabad. -413602
Adhar No .655812511843
Mob.No 7498278862

**NAME CHANGE DECLARATION**

Here in this advertisement, I hereby declare that I have changed my name, which was:
**LAIBA ANAM SAMIOUDDIN**
TO:**MANIYAR LAIBA ANUM SAMIOUDDIN.**
Henceforth, I shall be known by the name MANIYAR LAIBA ANUM SAMIOUDDIN, and I will use this name for all purposes in the future.
OLD NAME :- **LAIBA ANAM SAMIOUDDIN**
NEW NAME:- **MANIYAR LAIBA ANUM SAMIOUDDIN**
ADDRESS:- BUS STAND
Samarth Nagar, Opposite Scan Near Masjid, Osmanabad-413501, Maharashtra.
AADHAAR NO.:- 223117623911
MOBILE NO.:- 9699232100
I request all concerned to kindly note and update my name in all records and documents.
PLACE: OSMANABAD
DATE: 06/06/2025


# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649